पोलीस स्टेशन रामनगर जिल्हा चंद्रपूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर  **P.S.**(ठाणे): रामनगर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0862  **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):01/11/2025 02:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार
   **Date From** (दिनांक पासून): 31/10/2025
   **Time Period** (कालावधी):
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 31/10/2025
   **Time From** (वेळेपासून): 11:00 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 22:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 31/10/2025  **Time** (वेळ): 22:10 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 006
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 01/11/2025 02:04 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 3 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): देशमुख स्टॅम्प अँन्ड सेतु केंद्,जलनगर वार्ड चंद्रपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनी निलेश बकाराम उरकुडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र विभाग चंद्रपूर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र विभाग चंद्रपूर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8459848556

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिनष अरुण देशमुख | | | 1. देशमुख स्टम्प अॅन्ड सेतु केंद, बिएसएनएल टेलिफोन टवर समोर,,जलनगर चंद्रपूर ताजि चंद्रपूर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | रुपाली भरतलाल चौधरी | | | 1. भाग्यलक्ष्मी सोसायटी साईनगर , चंद्रपूर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | google कंपनीचा मोबाईल | 20,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | Realme कंपनीचा मोबाईल | 10,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | परवाना | पाच स्टम्प पेपर दिले बाबत नोंद केलेली असल्याने सदर रजिस्टरच्या पहिल्या दोन पानाची व दिनांक 31/10/20 | 0.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | मुद्रांक | 500 रू चे तीन स्टम्प पेपर व 100 रू चे पाच स्टम्प पेपर | 2,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | ज्यात 500 रू दराच्या चार, 100 रू दराची एक व 20 रू दराच्या दोन नोटांचे | 2,140.00 |
| 6 | इतर | इतर परिवहन | Sandisk micro SDHCTM Card पडताळनी कार्यवाहीचे मेमोरी कार्ड | 0.00 |
| 7 | इतर | इतर परिवहन | Sandisk micro SDHCTM Card सापडा कार्यवाहीचे मेमोरी कार्ड | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

34,140.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
पोलीस स्टेशन,रामनगर,
जि. चंद्रपूर

दिनांक 31/10/2025

नांव- निलेश बकाराम उरकुडे, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 8459848556

पोलीस स्टेशन रामनगर, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

दि. 30/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना मा. पोलीस उप अधीक्षक श्रीमती मंजुषा भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावुन त्यांचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तीचा परिचय आम्हास पराग अरूण सब्बनवार, वय 33 वर्षे, धंदा - कंत्राटदार असा करून दिला. मा. पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि चंद्रपूर यांनी आम्हास सांगितले की, पराग अरूण सब्बनवार यांची एका लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे.

त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करा. त्यावरून आम्ही तक्रारदार पराग अरुण सब्बनवार यांना आम्ही आमचे कक्षात घेवून आलो. तक्रारदार श्री. पराग अरुण सब्बनवार, वय 33 वर्षे, धंदा - कंत्राटदार, रा. भानापेठ वार्ड, चंद्रपूर ता.जि.चंद्रपूर हे वेळ अंदाजे 14.00 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पोलीस उप अधिक्षक कार्यालय, हुतात्मा स्मारक मागे वरोरा नाका, चंद्रपूर कार्यालयात हजर आले असुन त्यांनी आम्हास एका रूइतर लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही त्यास कोरा कागद उपलब्ध करुन देउन त्यांची तक्रार लिहुन देण्यास सुचीत केले, त्यानुसार त्यांनी त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही आमचे कार्यालयातील पोशि राकेश जांभुळकर यांना 15.10 दरम्यान मा.कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे नावे दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र देवून रवाना करण्यात आले. त्यानुसार मा.कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. अधिक महादेव श्रीरामे, वय 41 वर्षे, धंदा-नौकरी, मोजनीदार, कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर 2) सौ. मोनिका विनोद संदोकर, वय 36 वर्षे, धंदा-नौकरी, दफ्तर कारकून कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे पोशि राकेश जांभुळकर यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून आमचे कार्यालयात वेळ अनुक्रमे 16.30 वा. हजर आले. पोशि राकेश जांभुळकर यांनी त्यांचेसोबत आलेल्या दोन शासकीय कर्मचारी यांची ओळख आम्हास करुन दिली. आम्ही आमची दोन्ही पंचांना ओळख करून देऊन, आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमचेकडे एका रूइतर लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकाविरुध्द सापळ्याचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. तरी होणाऱ्या कार्यवाहीत आपली पंच म्हणुन काम करण्याची तयारी आहे का? असे विचारल्यावर दोन्ही पंचानी पडताळणी व सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविली. त्याबाबतचे संमतीपत्र दोन्ही पंचाकडून लिहून घेण्यात आले.

त्यानंतर आम्ही पंचाना तक्रारदार यांनी लिहुन दिलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे, " माझे नाव : श्री. पराग अरुण सब्बनवार, वय 33 वर्ष, व्यवसाय -कंत्राटदार, रा. भानापेठ वार्ड, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर मो.क्र. 9860572983

सविनय विनंती याप्रमाणे आहे की, वरील पत्यावर माझे परिवारासह राहतो व माझ्याकडे उदयोग, उर्जा व कामगार विभागाचे विद्युत ठेकेदाराचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र असुन दि. 23/05/2025 ते 22/05/2028 असे 03 वर्षाकरीता मुदत आहे. त्या प्रमाणपत्राचे आधारे शासनाकडुन करण्यात येणारे विद्युतीकरणाचे कंत्राट मला प्राप्त करता येतात. प्राप्त झालेल्या टेंडर नुसार विद्युतीकरणाचे काम मी करीत असतो.

अंदाजे मार्च/2025 मध्ये सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागामध्ये टेंडर करीता मला 100 /- रू. व 500/- रूपयाचे 02 मुद्रांक पेपर्सची आवश्यकता होती. त्याकरीता मी मुद्रांक विक्रेता श्री मनिष अरूण देशमुख यांचे जलनगर वार्ड चंद्रपूर येथील दुकानात जावून मी त्यांना 100/- रूपयाचा 01 व 500/- रूपयाचा 01 असे दोन मुद्रांक पेपर्स मागीतले असता त्यांनी मला 100/- रू. मुद्रांकावर 10/- रू. अतिरीक्त व 500/- रू. मुद्राकांवर 30/- रू. अतिरीक्त मागीतले. त्यावेळी मी गडबडीत असल्यामुळे व मला मुद्रांक पेपर्सची आवश्यकता असल्याने मी त्यांना नाइलाजास्तव 640/- रूपये देवून मुद्रांक पेपर्स खरेदी केले.

आज दिनांक 30/10/2025 रोजी मला सार्वजनिक बांधकाम विभाग येथे विज टेंडर करीता 500 /- रूपयाचे 03 मुद्रांक पेपर्स व 100/- रूपयाचे 05 मुद्रांक पेपर्स असे एकुण 2000/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सची आवश्यकता असल्याने प्रत्येक 500 रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर 30/- रू. असे 3 पेपर्सचे 90/- रूपये व प्रत्येक 100/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर 10/- रूपये असे 5 पेपर्सचे 50/- रूपये असे एकुण 2000/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर 2000/- रू. शासकीय शुल्कासह अतिरीक्त 140 /- रूपये लाच दिल्याशिवाय मुद्रांक पेपर्स देणार नसल्याची मला खात्री आहे. मला गैरअर्जदार श्री मनिष अरूण देशमुख, मुद्रांक विक्रेता रा. चंद्रपूर हयांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज दिनांक 30/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांना भेट्टन वरिलप्रमाणे लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी आपणास बोलावून आपली ओळख करून देवून आपणास पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सांगितले. त्यानंतर मी आपणास मला लाच मागणी संबंधाने तक्रार द्यायची असल्याचे सांगितले. त्यावरून आपण मला लेखी तक्रार देण्यास व गैरअर्जदारांनी मागणी केलेली लाच रक्कम जमा करण्यास सांगितले. त्यावरून मी वरील प्रमाणे माझी तक्रार सांगितली.

माझा गैरअर्जदार श्री मनिष अरूण देशमुख, मुद्रांक विक्रेता यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. मला सार्वजनिक बांधकाम विभाग येथे टेंडरचे कामाकरीता मुद्रांक पेपरची आवश्यकता असुन शासनाचे नियमानुसार कोणत्याही परवानाधारक मुद्रांक पेपर्स विक्रेत्याला शासनाकडुन कमिशन मिळत असल्याने ज्या किंमतीचे मुद्रांक पेपर आहेत त्याच किंमतीत विकणे अपेक्षीत आहे. परंतु 2000/- रूपयाचे मुद्रांक पेपर्सवर अतिरीक्त 140/- रू. लाचेची मागणी केल्यास गैरअर्जदार यांचेवर कारवाई होण्याकरीता त्यांचेविरूध्द लेखी तक्रार देत आहे. तसेच माझे बचतीतील 2140/- रू. लाच रक्कम वापरण्याकरीता यावेळी आपल्याकडे देत आहे.

तरी माझे तक्रारीवरून गैरअर्जदार श्री मनिष अरूण देशमुख, मुद्रांक विक्रेता, रा. चंद्रपूर यांनी मुद्रांक किंमती व्यतिरीक्त जास्त रूपये घेतली तर त्यांच्यावर कारवाई होणेस विनंती आहे''

अशाप्रकारे वरीलप्रमाणे तक्रार पंचानी वाचुन तक्रारीबाबत तक्रारदार यांचेशी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व त्यानंतर तक्रारदार यांनी लाचेत दिलेले 2140 रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतली.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोग व अँथ्रॉसीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रॉसीन पावडर हे अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासल्यास पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. साध्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही. अँथ्रॉसीन पावडर ही लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना लावली जाते. त्या नोटा जो कोणी हाताळेल त्याचे हातास नोटावरील काही पावडर चिपकते. तसेच त्या नोटा ज्या ठिकाणी ठेवल्या जातात त्या ठिकाणी ही पावडर चिपकते. सदर ठिकाणी व नोटा हाताळलेल्या व्यक्तीचे हात अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासल्यास अँथ्रॉसीन पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. त्यानंतर मपोशि मेघा मोहुर्ले यांना प्रात्याक्षिक करुन दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे मपोशि मेघा मोहुर्ले यांनी कार्यालयातील कपाटातुन एक सिलबंद लिफापा बाहेर काढला. दोन्ही पंचांनी सदर लिफापा सिलबंद असल्याची खात्री केल्यावर मपोशि मेघा मोहुर्ले यांनी लिफापा फाडून त्यामधुन अँथ्रॉसीन पावडर लेबल असलेली एक प्लास्टिक शिशी बाहेर काढुन तक्रारदार व पंचाना दाखविली. दोन्ही पंचासमक्ष त्या शिशीचे झाकण उघडून त्यामधील पावडर मपोशि मेघा मोहुर्ले यांनी आपल्या हाताच्या बोटास लावून त्या बोटाने एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर रेष मारुन दाखविली. ती रेष कार्यालयात उजेडामध्ये दिसत नव्हती. त्यानंतर कार्यालयाचे दारे, खिडक्या व विद्युत दिवे पुन्हा बंद केली व प्रकाशाची तिव्रता कमी करुन त्या कागदावर अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता कागदावर बोटाने रेष मारलेल्या ठिकाणी अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. नंतर दारे खिडक्या उघडून प्रकाश पुर्ववत केला असता कोणतीच चकाकी दिसून आली नाही. तद्नंतर लाच कार्यवाही जमा केलेल्या 500 रू दराच्या चार, 100 रू दराची एक व 20 रू दराच्या दोन नोटांचे नंबरची पाहणी करून सदर नोटांना कापसाच्या बोळ्याने अँथ्रॉसीन पावडर लावली व स्वतंत्र लिफाफयात सदर नोटा ठेवून पंचासमक्ष लिफापा लाखेने सिलबंद करून पंच क्र. 2 यांचे हस्ते ट्रॅप बॅगमध्ये ठेवण्यात आला. तसेच अँथ्रॉसीन पावडरची शिशी लिफाफ्यात ठेवून लिफापा पंचासमक्ष सिलबंद करून मपोशि मेघा मोहुर्ले यांनी कार्यालयीन कपाटात ठेवून दिली. त्यानंतर मपोशि/मेघा मोहुर्ले यांना सापळा कार्यवाहीतुन वगळण्यात आले. आमचे कार्यालयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान होणारे संभाषण रेकॉर्ड करण्याकरिता उपयोग करण्यात येणार आहे. सदर उपकरण रेकॉर्डींग मोडवर सुरू केल्यास रेकॉर्ड झालेल्या संभाषणाची व्हॉईस फाईल तयार होत असून जर हे उपकरण बंद झाले तर रेकॉर्डींग सुध्दा बंद होते आणि व्हॉईस फाईल बंद होते. आणि पुन्हा जर रेकॉर्डींग मोडवर सुरू केले असता नविन व्हॉईस रेकॉर्डींग फाईल तयार होते व पुर्वीची रेकॉर्ड फाईल खराब होत नाही किंवा त्यावर पुनर्लिखान किंवा पुर्नमुद्रीत होत नाही. सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर '' SONY'' कंपनीच्या बनावटीचे ICD-PX470 मॉडेलचे आहे. आमचे सुचनेवरून पोशि/अमोल सिडाम यांनी पंचासमक्ष कपाटातून नवीन सिलबंद Sandisk micro SDHCTM Card 32GB मेमरीकार्ड काढुन मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकून स्वीच ऑन करुन तपासले असता मेमरी कार्ड आणि इंटरनल मेमोरीमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हॉईस रेकॉर्डींगची फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यांनतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सांगितले की, सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान डिजिटल व्हॉइस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणारे संभाषण हे मेमोरी कार्डमध्ये मुद्रीत होईल त्यानंतर ते मेमोरी कार्ड हॅश व्हॅल्यू काढल्यानंतर एका लिफाफ्यात ठेवून आमचे व पंचाचे सहीने सिलबंद करण्यात येईल. अशी माहीती देउन सदर सापळा कार्यवाहीत श्री. अधिक महादेव श्रीरामे हे पंच क्र 1 व सौ. मोनिका विनोद संदोकर हे पंच क्र 2 म्हणुन कामगिरी बजावतील असे (उर्वरित फिर्याद मुळ कागदपत्रात समाविष्ट करण्यात आली

आहे )

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Asif Baktawar Sheikh(I (Inspector)) / pcmh86017 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Asif Baktawar Sheikl
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pcmh86017

API वा१८३
डयुटी ऑफीसर
पो.स्टे रामनगर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ दर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची/ सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)